**प्रेस नोट** **अमळनेर दि.२१.०२.२०१८**

आज रोजी मा.पोलीस अधिक्षक,सो, जळगांव श्री दत्तात्रेय कराळे, व मा.अपर पोलीस अधिक्षक सो,चाळीसगांव श्री प्रशांत बच्छाब यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी,श्री.आर.वाय.शेख अमळनेर उपविभाग अमळनेर यांना मिळालेल्या बातमीनुसार अमळनेर शहरातील ताडेपुरा भागातील कंजरवाडा भागात इसम नामे अशोक इबु कंजर हा त्याची पत्नी मालाबाई अशोक कंजर हिचे सोबत मोठया प्रमाणात गांजाचा साठा घरात लपवुन ठेवून त्याची विक्री करीत आहे..अशी गुप्त बातमी मिळाल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.आर.वाय.शेख अमळनेर विभाग व त्यांचे सोबत असलेले पोलीस स्टॉफ पोलीस उपनिरीक्षक गोकुळ पाटील,पोहेकॉ २३० नरसिंह वाघ,नापोकॉ २५८४ मेघराज महाजन,नापोकॉ १७८८ सुहास पाटील,नापोकॉ १४८५ योगेश पाटील,पोनाकॉ ईश्वर शिंदे,पोना संजय दगडु पाटील,पोकॉ विलास पाटील ,महिला पोकॉ रेखा ईशी अशांनी शासकिय पंच विशाल हेमंत भावसार व विजय भास्कर महाजन अशांना सोबत घेवुन सदर भागात छापा टाकला.सदर ठिकाणी आरोपी महिला मालाबाई अशोक कंजर ही मिळुन आली तिच्या ताब्यात १ क्विंटल १६ किलो गांजा किंमत ११६००००/- तसेच ३०००/- रुपये किंमतीची देशी व गावठी दारु असा माल मिळुन आल्याने तिचे विरुध्द अमळनेर पोलीस स्टेशनला एन.डी.पी.एस.कायदा कलम २० व २२ तसेच मुंबई प्रोव्ही.का.कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली असुन आरोपी अशोक ईबू कंजर हा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक श्री विकास वाघ हे करीत आहेत.




बेस्ट पोहा एवं
के निर्माता
राजनांदगाँव (छ.ग.)
श्यामसुन्दर